## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. ५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०१/२०१८

### १) अवैधरित्या रेतिची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक २६/०१/२०१८ चे ४.४५ वाजता. दरम्यान यातील ट्रक्टर क्र.३६ एल ७१४९ चा चालक आरोपी क्र.१ याने ट्रॅक्टरच्या मालक क्र. २ याचे सांगण्या वरून येणोळा रेतिघाटा वरून ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ७१४९ मध्ये १ ब्रास कि. २,०००/रु. विना रॉयल्टीने चोरी करून, वाहतुक करून घेवुन जात असतांना फिर्यादी (तहसीलदार) यांना मिळुन आल्याने, फिर्यादीने जप्ती पंचनामा तयार करून ट्रॅक्टर व चोरीची रेती तहसील कार्यालयात पवनी येथे घेवुन जाणारा आरोपी ट्रॅक्टर क्र. १ चे चालकास सांगितले असता ट्रॅक्टचा चालक आरोपी याने रेतीसहीत ट्रॅक्टर निलज फाटयाकडे घेवुन पडुन गेल्याने, सरतर्फे फिर्यादी गजानन सुरजी कोकडे वय ५४ वर्ष रा.तहसील कार्यालय पवनी (तहसीलदार) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,१०९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

### २) मेटयाडोहच्या धडकेत दोन जखमी. :—

दिनांक २६/०१/२०१८ चे २०.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे मित्र जयप्रभु सुरेश वंजारी वय २२ वर्ष रा. पाचगाव याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ८७१९ वर मागे बसुन जात असतांनी, मागेहुन येणारा मेटयाडोह क्र. एमएच ३१ एम ३४०१ चे चालकाने त्याचे ताब्यातील मेटयाडोह भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन त्याचे मोटार सायकलला मागेहुन ठोस मारून जखमी करण्यास व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने, फिर्यादी विनोद सुर्यभान खंगार वय २४ वर्ष रा. पाचगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

### ३) निष्काळजीपणे वाहन चालवुन गाडी पल्टी होवुन एकाचा मृत्यु . :—

दिनांक २६/०१/२०१८ चे १२.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी व त्याचे मित्र असे मिळुन टोयाटो ईटीएस जीडी क्र. एमएच ३० एच ३३५२ ने पिटेझरी गावा कडुन साकोली कडे येत असतांना यातील आरोपी गाडी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन गाडीचे टायर फुटल्याने गाडी ही रोडचे कडेला जावुन पल्टी झाल्याने आदीत्य अतकरी वय १९ वर्ष रा. गणेश नगर नागपुर यास गंभिर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी अक्षय शिवाजी वैतागे वय २४ वर्ष रा. ईतवारी नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. रेवतकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

४) ट्रकची स्विप्ट डीझायर वाहनाला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक २६/०१/२०१८ चे १६.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे मारोती सुझुकी कंपनीची स्विप्ट डीझायर गाडी क्र. एमएच ४८ एच १९९० ने देवरी वरून नागपुर कडे जात असतांना यातील आरोपी चालकाने, त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचें ऊभे गाडीला धडक मारून २५,०००/रु. चे नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,४२७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परसुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) नगदी पैसे व मोटार सायकलची चोरी. :—

दिनांक २५/०१/२०१८ चे २०.३० ते २६/०१/२०१८ चे ०६०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी विनोद सोविंदा वाघमारे वय ४५ वर्ष रा. कान्द्री याचे केन्द्र दुकानाचे कोणीतरी अज्ञात चोराने शटर्स वाकवुन आत प्रवेश करून दुकानाचे ड्राव्हर मधील नगदी ६०००/रु. व दुकाना बाहेर ठेवलेली होंडा ॲक्टीव्हा गाडी क्र. एमएच ३६ टी ८५६९ कि. २५,०००/रु. व दिनेश नत्थु समरीत यांचे मोटार सायकल एजन्सी दुकानातील ड्राव्हर मधील नगदी ५,०००/रु. असा एकुण ३६,०००/रु . चामाल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हसकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

६) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—

दिनांक २६/०१/२०१८ चे ०१.०० वाजता. दरम्यान यातील मृतक विजय पाडुरंग नागपुर वय ६४ वर्ष रा. संताजी वार्ड भंडारा, हा दारू पिवुन घरीच पाय—यावर पडल्याने डोक्यावर मार लागल्याने उपचार करीता सा.रू.भंडारा येथे दि.२३/०१/२०१८ ला भरती झाला असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने सरतर्फे पोना. शहारे यांचे रिपोर्ट व डॉ.मेमो वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

७) शेतात इसमाचे प्रेत मिळुन आल्याने . :—

दिनांक २६/०१/२०१८ चे ११.०० वाजता. दरम्यान यातील मृतक गोंविदा हिळकु रामटेके वय ७५ वर्ष रा. मालदा हा दि. २६/०१/२०१८ ला सकाळी ११.०० वा. चे सुमारास आत्माराम संयाम रा. दिघोरी याचे शेतात मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी कृष्णा नड्डु रामटेके वय ४७ वर्ष रा. मालदा यांचे रिपोर्ट व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गभने पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

**८) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २६/०१/२०१८ चे १८.२० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल ही त्रीमुर्ती चौक भंडारा येथे दारु पिवुन दारुचे नशेत मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. दुर्गे वानिशा.भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक २६/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी व सिहोरा येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४०लिटर हातभट्टी दारू किंमती २४,००/–रु चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २६/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती– ०४ केसेस व ईतर वाहनांवरती – १७ केसेस करण्यात आले आहे.

पोनी. (एस.आर. तेलुरे)
जिविशा शाखा
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१२५३५४९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.